# वाहतूक नियंत्रण अधिसुचना

जा.क्र./पोउआ/वाह/नियोजन/4590 /२०२१ पिंपरी-चिंचवड, दिनांक - 28 /१२/२०२१

विषय :- दि.०१/०१/२०२२ रोजी जयस्तंभ पेरणेफाटा ता.हवेली जि.पुणे येथील कार्यक्रमाचे अनुषंगाने वाहतूक पर्यायी मार्गाने वळविणेबाबत अधिसुचना.

दि.०१/०१/२०२२ रोजी जयस्तंभ कार्यक्रम मौजे पेरणेफाटा ता.हवेली जि.पुणे येथे होणार असल्याने पर्यायी मार्गाबाबत खालीलप्रमाणे अधिसुचना जारी केली आहे.

१..चाकण ते शिक्रापुर व शिक्रापुर ते चाकण अशी दोन्ही बाजुकडील जाणारी येणारी सर्व प्रकारची वाहने पुर्णपणे बंद करणे.

२.अहमदनगर बाजुकडुन पुणे मुंबई बाजुकडे येणारी जड वाहने ही शिरुर,न्हावरा फाटा, न्हावरा, पारगांव, चौफुला, यवत, हडपसर या मार्गे पुणेकडे येतील.

३.पुणे बाजुकडुन अहमदनगर बाजुकडे जाणारी जड वाहने ही खराडी बायपास येथुन हडपसर,पुणे सोलापुर हायवे रोडने चौफुला,केडगाव मार्गे न्हावरा,शिरुर,अहमदनगर अशी वळवणे.

४.सोलापुर रोडवरुन आळदी चाकण या भागात जाणारी जड वाहने,माल वाहतूक (टेम्पो/ट्रक) ही वाहने हडपसर, मगरपट्टा, खराडी बायपास मार्गे विश्रांतवाडी येथुन आळंदी व चाकण येथे जातील.

५.मुंबई येथुन अहमदनगरकडे जाणारी जड वाहने/माल वाहतूक (टेम्पो/ट्रक) ही वाहने वडगांव मावळ,चाकण,खेड मंचर,नारायणगांव,आळेफाटा मार्गे अहमदनगरकडे जातील.

६.मुंबई येथुन अहमदनगर बाजुकडे जाणारी हलकी वाहने उदा.कार,जिप इ. वडगाव मावळ, चाकण, खेड, पाबळ, शिरुर मार्गे अहमदनगर येथे जातील.

७. आळंदी- शेलपिंपळगाव- बहुळ- साबळेवाडी दोन्ही बाजुकडील जाणारी – येणारी सार्वजनिक/खाजगी प्रवासी वाहतूक पुर्णपणे बंद करण्यात येत आहे.

८. आळंदी - मरकळ – लोणीकंदकडे जाणारी – येणारी दोन्ही बाजुकडील सार्वजनिक/खाजगी प्रवासी वाहतूक पुर्णपणे बंद करण्यात येत आहे.

तसेच पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रात वाहतूक सुरळीत राहणेकरीता खालीलप्रमाणे वाहतूक वळविण्यात येत आहे.

१.नाशिककडुन येणारी मोठी वाहने हि शिक्रापुरकडे न जाता तळेगाव चाकण चौकातुन मोशी व तळेगावकडे जावू शकतील.

२.देहुरोड येथे मुंबई जुन्या हायवेने येणारी वाहतुक सेंट्रल चौकातुन निगडी पिंपरी-चिंचवडकडे न सोडता सदरची वाहतुक सेंट्रल चौकाकडुन मुंबई बेंगलोर हायवेने सरळ वाकडनाका, चांदणी चौकातुन इच्छीत स्थळी जावू शकतील.

३.मुंबईकडुन एक्स्प्रेस हायवेने पुणेकडे येणारी वाहने उर्से टोल नाका येथुन मुंबई बेंगलोर हायवेने (निगडी मुकाई चौकाकडे न जाता) सरळ वाकडनाका व राधा चौक येथुन पुणेकडे जावू शकतील.

४.मुंबई कडुन एक्सप्रेस हायवेने खिंडीतुन तळेगावकडे जाणारी वाहतूक वडगाव फाट्याकडे न जाता उर्सेटोल नाका येथुन देहुरोडकडे जाणारा बाह्यवळण रोडने जातील.

५.नाशिक व तळेगावकडुन येणारी वाहतूक ही तळेगाव चाकण चौकातुन शिक्रापुर कडे न जाता मोशी नाशिकफाटा मार्गे पुणे शहरकडे जावु शकतील.

ज्याअर्थी पिंपरी चिंचवड शहरातील वाहतुक सुरक्षित व सुरळीतपणे होणेकरीता, महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एम. व्ही. ए. ०१९६/८७१/सी आर - ३७/टी आर ए - २, दिनांक - २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशन नुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन प्राप्त हरकती व सुचनांचा विचार करुन मी आनंद भोईटे, पोलीस उप-आयुक्त वाहतुक शाखा, पिंपरी चिंचवड, यापुर्वी काही निर्बंध असतील ते रद्द करण्यात येत असुन तात्पुरत्या स्वरुपात खालील प्रमाणे वाहतूक वळविण्याबाबत आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

तरी नागरीकांनी पर्यायी मार्गाचा वापर करावा. अत्यावश्यक सेवेतील वाहने (उदा. फायरब्रिगेड, पोलीस वाहने, रुग्णवाहीका, इ.) खेरीज करुन तात्पुता स्वरुपात आदेश काढण्यात येत आहे.

वरील प्रमाणे चाकण, दिघी-आळंदी व देहुरोड-तळेगाव वाहतुक विभाग अंतर्गत येणा-या व जाणा-या सार्वजनिक/खाजगी प्रवासी वाहनांकरीता वरील मार्गावर **दि.०१/०१/२०२२ रोजी सायं. ००.०१ वा पासुन ते रात्रौ २४.०० वा.** पर्यत वाहतुक वळविणेबाबत अधिसुचना **(नोटीफिकेशन)** काढण्यात येत आहे.

(आनंद भोईटे)
पोलीस उप-आयुक्त, वाहतूक
पिंपरी चिंचवड.

प्रति,
जिल्हा माहिती व प्रसिध्दी अधिकारी, नविन मध्यवर्ती इमारत, पुणे - ०१.

प्रत :
१) मा. पोलीस आयुक्त सो,पिंपरी चिंचवड शहर
२) पोलीस निरीक्षक, प्रेसरुम, पोलीस आयुक्त कार्यालय, पिंपरी चिंचवड शहर.
/-सदर प्रेसनोटच्या प्रती पत्रकारांना देवून, सदरची बातमी वर्तमान पत्रातून प्रसिध्द करण्याची विनंती करावी.
३) प्रभारी अधिकारी संबंधीत वाहतुक विभाग